महाराष्ट्र शासन
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**
मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☎२२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☎२२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

**क्र. ३७४(२)/स्थापत्य/२०२०/१९** **दिनांक:- ३१ मार्च, २०२२**

# प्रसिध्दीपत्रक

**विषय :- महाराष्ट्र स्थापत्य अभियांत्रिकी सेवा (मुख्य) परीक्षा-२०२० लेखी परीक्षेच्या निकालाबाबत**

**संदर्भ :- १) पूर्व परीक्षा जाहिरात क्र. ०६/२०२० व मुख्य परीक्षा जाहिरात क्र. ६१/२०२१**
**२) आयोगाचे समक्रमांकाचे दिनांक २५ मार्च, २०२२ रोजीचे प्रसिध्दीपत्रक**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे दिनांक १८ डिसेंबर, २०२१ रोजी घेण्यात आलेल्या महाराष्ट्र स्थापत्य अभियांत्रिकी सेवा (मुख्य) परीक्षा-२०२०च्या लेखी परीक्षेचा निकाल आयोगाच्या संकेतस्थळावर दिनांक २५ मार्च, २०२२ रोजी प्रसिध्द करण्यात आला आहे.

२. सदर निकालाद्वारे मुलाखतीकरीता पात्र न ठरलेल्या उमेदवारांना त्यांचे गुण आयोगाच्या https://mpsc.gov.in या संकेतस्थळावरील ONLINE FACILITIES मधील View Marksheet या वेबलिंकद्वारे उपलब्ध करुन देण्यात आले आहेत. तसेच, गुणांची फेरपडताळणी (Retotalling) करु इच्छिणाऱ्या उमेदवारांना फेरपडताळणीकरीता अर्ज सादर करण्यासाठी दुवा (वेबलिंक) उपलब्ध करुन देण्यात येत आहे. सदर वेबलिंकद्वारे विहित शुल्कासह अर्ज सादर करण्याकरिता पुढीलप्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक आहे:-

(१) आयोगाच्या https://mpsc.gov.in या संकेतस्थळावरील ONLINE FACILITIES मधील Retotalling of Marks या लिंकवर क्लिक करावे.

(२) उपलब्ध होणाऱ्या परीक्षांच्या यादीमधून संबंधित परीक्षेची निवड करावी.

(३) परीक्षेच्या अर्जात नमूद मोबाईल क्रमांक नमूद करून सदर क्रमांकावर प्राप्त होणारा ओटीपी प्रविष्ट करून लॉगीन करावे.

(४) Retotalling संदर्भातील लिंकवर क्लिक करावे.

(५) उपलब्ध होणाऱ्या गुणपत्रातील फेरपडताळणी करावयाची असलेल्या एक किंवा जास्त विषयाची निवड करून 'Save' बटणवर क्लिक करावे.

(६) निवड केलेल्या विषयानुसार सेवा शुल्कासह विहित शुल्क ऑनलाईन पध्दतीने अदा करावे.

३. गुणांच्या फेरपडताळणी करीताची सदर वेबलिंक दिनांक ३१ मार्च, २०२२ ते दिनांक ९ एप्रिल, २०२२ या कालावधीत उपलब्ध करून देण्यात येत आहे. सदर लिंक दिनांक ९ एप्रिल, २०२२ रोजी रात्री २३:५९ वाजेपर्यंत सुरू राहील.

४. उपरोक्त विहित कार्यपध्दतीनुसार गुणांच्या फेरपडताळणीकरीता अर्ज करताना कोणत्याही प्रकारच्या तांत्रिक अडचणी निर्माण झाल्यास आयोगाच्या १८००-१२३४-२७५ किंवा ७३०३८२१८२२ या टोल फ्री क्रमांकावर अथवा support-online@mpsc.gov.in या ईमेल आयडीवर संपर्क साधता येईल.

**ठिकाण :- मुंबई**

**उपसचिव,परीक्षोत्तर राजपत्रित परीक्षा**
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग.**